DISTRICT MAGISTRATE OSMANABAD

# जिल्हादंडाधिकारी कार्यालय,उस्मानाबाद

## (उपचिटणीस शाखा)

दुरध्वनी क्रमांक 02472-227301 फॅक्स क्रमांक 02472-228018

Email ID- rdc1osmanabad@gmail.com


वाचा:- 1. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 13 मार्च 2020.

2. महाराष्ट्र शासन, सार्वजनिक आरोग्य विभाग, अधिसूचना क्र. करोना 2020/प्र.क्र. 58/आरोग्य 5 दि. 14 मार्च 2020.
3. आपत्ती व्यवस्थापन कायदा 2005 चे कलम 30, 33, 34, 41, व कलम 51.
4. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 21.03.2020.
5. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 22.03.2020.
6. या कार्यालयाचे आदेश क्र. 2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर-26 दि. 24.03.2020.
7. भारत सरकार, गृह विभाग यांचे आदेश क्र. 40-3/2020-DM-1(a) दि. 24.03.2020.
8. महाराष्ट्र शासन, महसूल व वने, आपत्ती व्यवस्थापन, मदत व पुनर्वसन विभाग, अधिसूचना क्र. DMU/2020/CR.92/DisM-1 दि. 25.03.2020.

---

क्र.2020/उपचिटणीस/एमएजी/सीआर- 26
दिनांकः- 27/03/2020.

**आदेश**

ज्याअर्थी उपरोक्त वाचा क्र. 2 चे अधिसूचनेद्वारे महाराष्ट्र शासनाने "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" प्रसिद्ध केले असून यातील नियम क्र. 3 नुसार करोना विषाणुमुळे (COVID-19) उद्भवलेल्या संसर्गजन्य रोगाचा प्रतिबंध व नियंत्रण यासाठी जिल्हाधिकारी यांना त्यांचे कार्यक्षेत्रात सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे.

ज्याअर्थी संदर्भ क्र. 4 चे आदेशान्वये उस्मानाबाद जिल्हयामध्ये फौजदारी प्रक्रिया संहिता 1973 चे कलम 144 अन्वये आदेश पारित केला आहे. तसेच संदर्भ क्र. 5 चे आदेशान्वये लॉकडाऊनचा आदेश पारित केला आहे व संदर्भ क्र. 7 नुसार भारत सरकारकडून प्राप्त झालेल्या सूचनांनुसार दि. 14 एप्रिल 2020 पर्यंत लॉकडाऊन सुरु ठेवणेबाबत संदर्भ क्र. 6 चे आदेशान्वये आदेशित केले आहे.

ज्याअर्थी उस्मानाबाद जिल्हयातील ब-याच खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांनी आपल्या रुग्णालयातील बाहयरुग्ण सेवा बंद केली असल्याचे व त्यामुळे जिल्हाभरातून येणा-या रुग्णांना आरोग्य सेवा उपलब्ध होत नसल्याचे निदर्शनास आले आहे तसेच याबाबत तक्रारी प्राप्त झाल्या आहेत.

त्याअर्थी मी दिपा मुधोळ-मुंडे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद उपरोक्त वाचा क्र. 2 व 3 अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारांनुसार उस्मानाबाद जिल्हयातील सर्व खाजगी वैद्यकीय व्यावसायिकांना त्यांच्या रुग्णालयात आवश्यकतेनुसार बाह्यरुग्ण सेवा व 24 तास अत्यावश्यक सेवा उपलब्ध करून देणे बाबत आदेशित करीत आहे. याबाबत कोणत्याही स्वरुपाची



Scanned by CamScanner

तक्रार होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. जर रुग्णांना जरुरीचे बाह्यरुग्ण सेवा व 24 तास अत्यावश्यक सेवा न मिळाल्यास संबंधित खाजगी व्यावसायीकांचे बॉम्बे नर्सिंग होम ॲक्ट अंतर्गत करण्यात आलेली नोंदणी रद्द करण्यात येईल याची गांभीर्याने नोंद घेण्यात यावी.

सदर आदेशाचे उल्लंघन करणारी व्यक्ती, संस्था अथवा संघटना उपरोक्त वाचा क्र. 3 मधील तरतुदींनुसार तसेच उपरोक्त वाचा क्र. 2 मधील "महाराष्ट्र कोव्हीड 19 उपाययोजना नियम, 2020" चे नियम 11 नुसार, भारतीय दंड संहिता (45 ऑफ 1860) कलम 188 मधील तरतुदींनुसार दंडनिय/कायदेशीर कारवाईस पात्र राहील.

सदर आदेशाची अंमलबजावणी आदेशाच्या दिनांकापासून तात्काळ लागू करण्यात येत आहे.

(दिपा मुधोळ-मुंडे)
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष,**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, उस्मानाबाद**

**प्रत:-** मा. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना माहितीस्तव सविनय सादर.

**प्रत:- आवश्यक कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
2. पोलीस अधीक्षक, उस्मानाबाद.
3. जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, उस्मानाबाद.
4. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि. प. उस्मानाबाद.
5. अध्यक्ष, इंडियन मेडीकल असोसिएशन, शाखा उस्मानाबाद.
6. जिल्हा प्रशासन अधिकारी, न. पा. प्र. जि. का. उस्मानाबाद.
7. जिल्हा माहिती अधिकारी, उस्मानाबाद.
8. उपविभागीय अधिकारी तथा INCIDENT COMMANDER सर्व जिल्हा उस्मानाबाद.
9. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रा. पं. जि. प. उस्मानाबाद.
10. कृषी विकास अधिकारी, जिल्हा परिषद, उस्मानाबाद.
11. तहसिलदार तथा INCIDENT COMMANDER सर्व जिल्हा उस्मानाबाद.
12. गट विकास अधिकारी सर्व जिल्हा उस्मानाबाद.
13. मुख्याधिकारी सर्व नगर परिषद व नगर पंचायत जिल्हा उस्मानाबाद.
14. सर्व संबंधितांस अनुपालनास्तव.

27/2/20
**जिल्हाधिकारी, उस्मानाबाद**
DISTRICT MAGISTRATE
OSMANABAD



Scanned by CamScanner